९/०७/२०२१

**सीजीएसटी कायदा कलम ७३,७४ आणि ७६ अंतर्गत नोटीसींचा परिणाम**

**अमित लुल्ला**

**कर सल्लागार ,सांगली**

कलम ७३ प्रमाणे कारणे दाखवा नोटीस

१) कलम ७३ मध्ये, कर न भरणे, कर कमी भरणे, मुद्दामून जास्त परतावा मागणे , चुकीचा इनपुट टॅक्स क्रेडिट घेणे किंवा वापरणे याचा उल्लेख केलेला आहे. यामध्ये फसवेगिरी किंवा जाणूनबुजून खोटे स्टेटमेंट देणे किंवा एखादी घटना लपवणे असे अपेक्षित धरलेले नाही.

२) वरील प्रमाणे ठरवल्यानंतर, योग्य अधिकारी संबंधित व्यक्तीस नोटीस काढून कलम ५० प्रमाणे व्याजासह कर भरणा का भरू नये याबाबतीत त्याला म्हणणे मांडण्याची संधी देतो.

३) कलम ७३(२) आणि ७३(१०) प्रमाणे निवाडा देण्यासाठी जी तारीख ठरवलेली आहे त्या तारखेपूर्वी किमान तीन महिने अशा प्रकारची कारणे दाखवा नोटीस देणे आवश्यक आहे. म्हणजेच दोन वर्ष किंवा वार्षिक विवरणपत्रक भरण्याच्या मुदतीनंतर नऊ महिन्यांमध्ये वर नमूद केलेली नोटीस दिली पाहिजे.

तसेच वार्षिक विवरणपत्र भरण्यासाठी जी मुदत ठरलेली आहे त्या मुदतीनंतर तीन वर्षात किंवा चुकीच्या पद्धतीने परतावा घेतला असेल तर त्यानंतर तीन वर्षात सदरचा निवाडा दिला पाहिजे.

४) शून्य दंडासाठी पहिली संधी--

अ) संबंधित व्यक्तीला कर आणि व्याज भरण्यासाठी वस्तू आणि सेवा कर अधिकारी फॉर्म जीएसटी डीआरसी --०१A, भाग A मध्ये सूचना देतो. भाग A मध्ये भराव्या लागणाऱ्या कराचा थोडक्यात उल्लेख असतो.

ब) कारणे दाखवा नोटीस काढण्यापूर्वी ही बंधनकारक सोय उपलब्ध करून दिलेली आहे. याचे कारण कलम ७३ अंतर्गत कारणे दाखवा नोटीस येण्यापूर्वी भरणा असलेला कर व्याजासह जर भरला तर दंड अजिबात लागत नाही. ही संधी संबंधित व्यापाऱ्याने वाया जाऊ देऊ नये.

क) जर संबंधित व्यापाऱ्याला संपूर्ण रक्कम भरावयाची नसेल किंवा कर भरणा मान्य करावयाचा नसेल तर त्याने डीआरसी-- ०१A मधील भाग B मध्ये त्या संबंधित माहिती पुरवावी.

५) शून्य दंडासाठी दुसरी संधी

अ) वर नमूद केल्याप्रमाणे जर व्यापाऱ्याने कलम ७३(३) अंतर्गत दिलेल्या संधीचा स्वीकार केला नाही, तर सदर व्यक्तीस जीएसटी डीआरसी-०३ मध्ये कारणे दाखवा नोटीस आल्यापासून तीस दिवसात दंडासह कर भरण्याची दुसरी संधी दिली जाते.

ब) अशी माहिती व्यापाऱ्याकडून मिळाल्यानंतर संबंधित अधिकारी फॉर्म जीएसटी डीआरसी-०५ मध्ये कार्यवाही संपल्याची सूचना देतो. असे झाल्यास कलम १३२ सोडून सदर नोटीसीने सुरुवात केलेली कार्यवाही संपली असे गृहीत धरले जाईल आणि कोणताही दंड भरायला लागणार नाही.

६) दंडाची कार्यवाही

करदात्याने वरील दोन्ही प्रकारची संधी जर स्वीकारली नाही तर योग्य अधिकारी निवाडा प्रक्रिया सुरू करेल आणि कराच्या १०% किंवा रुपये १०००० यापैकी जे जास्त असेल तो दंड लावेल.

कलम ७४ प्रमाणे कारणे दाखवा नोटीस

१) कलम ७४ मध्ये कर न भरणे,कमी भरणे, चुकीचा परतावा घेणे, कोणत्याही कारणाने चुकीचा इनपुट टॅक्स क्रेडिट घेणे किंवा वापरणे याचा उल्लेख केलेला आहे. यामध्ये कर चुकविण्यासाठी,फसवेगिरी करणे, जाणून बुजून खोटे स्टेटमेंट देणे, तथ्य लपवणे याचा समावेश होतो. वरील प्रमाणे ठरविल्यानंतर योग्य अधिकारी संबंधित व्यक्तीस नोटीस काढून कलम ५० प्रमाणे व्याजासह कर आणि कराच्या १००% इतका दंड का भरू नये या बाबतीत त्याला म्हणणे मांडण्याची संधी देतो.

२) कलम ७४(२)आणि ७४(१०) प्रमाणे निवाडा देण्यासाठी जी तारीख ठरवलेली आहे,त्या तारखेपूर्वी किमान सहा महिने अशा प्रकारची कारणे दाखवा नोटीस देणे आवश्यक आहे.

तसेच वार्षिक विवरणपत्र भरण्यासाठी जी मुदत ठरलेली आहे त्या मुदतीनंतर पाच वर्षात किंवा चुकीच्या पद्धतीने परतावा घेतला असेल तर त्यानंतर पाच वर्षात सदरचा निवाडा दिला पाहिजे.

३) १५% दंड भरून बाहेर पडण्याची पहिली संधी

संबंधित व्यक्तीला कर, व्याज आणि १५ % दंड भरण्यासाठी योग्य अधिकारी फॉर्म जीएसटी डीआरसी -०१A भाग Aमध्ये कारणे दाखवा नोटीस न काढता सूचना देतो.

अशावेळी करदात्याने जीएसटी  डीआरसी-०३ मध्ये सदरची रक्कम भरून योग्य अधिकाऱ्याला कळविले पाहिजे. अशी माहिती मिळाल्यानंतर योग्य अधिकाऱ्याने जीएसटी डीआरसी-०४ मध्ये पोच दिली पाहिजे आणि त्याला कलम ७४(१) ची नोटीस बजावायचे कारण नाही.

४) २५ % दंड भरून बाहेर पडण्याची दुसरी संधी

कारणे दाखवा नोटीस पाठविल्यानंतर जर करदात्याने भरावयाचा कर, व्याज आणि २५ % दंड जर जीएसटी डीआरसी-०३ मध्ये ३० दिवसाच्या आत भरला आणि योग्य त्या अधिकाऱ्याला लेखी कळवले तर अशावेळी सदरची माहिती मिळाल्यानंतर संबंधित अधिकारी कार्यवाही संपल्याचे कळवितो.

५) पन्नास टक्के दंड भरून बाहेर पडण्याची तिसरी संधी

निकाल दिल्यानंतर करदाता ५०% टक्के दंड भरून तिसरी संधी स्वीकारून बाहेर पडू शकतो. ज्यावेळी करदाता, भरावयाची रक्कम, व्याज आणि ५०% दंड फॉर्म जीएसटी डीआरसी- ०३ मध्ये ३० दिवसाच्या आत भरतो आणि तसे योग्य अधिकाऱ्याला लेखी कळवतो, अशावेळी संबंधित अधिकारी कार्यवाही बंद झाल्याचे सदर व्यापाऱ्यास कळवितो.

कलम ७६ प्रमाणे कारणे दाखवा नोटीस -

अ) कलम ७६ मध्ये व्यापाऱ्यांनी कर गोळा केला परंतु तो सरकारकडे जमा केला नाही अशा परिस्थितीचा उल्लेख आहे

ब) एखादा पुरवठा करपात्र असो अगर नसो परंतु जर कोणतीही रक्कम जीएसटी कायद्याअंतर्गत 'कर' म्हणून वसूल केली असेल तर ती सरकार दरबारी भरली पाहिजे.

क) जर कोणतीही रक्कम नियमाप्रमाणे भरावयाची असेल परंतु ती रक्कम जर भरली नाही तर योग्य अधिकारी सदर व्यापाऱ्याला कारणे दाखवा नोटीस बजावतो आणि कर तसेच कराएवढीच रक्कम दंड म्हणून का वसूल करू नये याची विचारणा करतो.

ड) विशेष म्हणजे अशी नोटीस बजावण्याकरीता संबंधित अधिकाऱ्याला  कालावधीची कोणतीही मर्यादा नाही. करचुकवेगिरीची माहिती मिळाल्यानंतर कैंव्हाही सदर नोटीस बजावता येते.

इ) या कलमाअंतर्गत दंडामध्ये सूट देता येत नाही.

इ) नोटीस बजावल्यानंतर एक वर्षाच्या आत निकाल दिला पाहिजे.